प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक ०८.०९.२०२६

# धुळे तहसिल कार्यालयातील तलाठी दिनेश दाभाडे, तलाठी मृणाल नगराळे यांनी तक्रारदार यांच्याकडे १२,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम खाजगी इसम जयेश चौधरी यांचे हस्ते स्विकारल्याने गुन्हा

| अ.क्र. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| १ | घटक | धुळे |
| २ | तक्रारदार | पुरुष, वय २६ वर्षे, |
| ३ | आरोपी | १. दिनेश दिलवर दाभाडे, वय ४० वर्षे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), मोहाडी, अति. कार्यभार फागणे, ता.जि. धुळे,<br>२. मृणाल शरद नगराळे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), बाळापुर, ता.जि. धुळे (फरार)<br>३. जयेश कैलास चौधरी, वय ३१ वर्षे (खाजगी इसम) |
| ४ | तक्रार | तक्रारदार यांचा बांधकाम मटेरीयल वाहतुकीचा व्यवसाय असुन त्यांचे मालकीचे हायवा वाहन हे वाहन चालकासह धुळे शहरातील साक्री रोडवरील मोती नाल्याचे पुढे थांबलेले असतांना त्याठिकाणी धुळे येथील तलाठी दाभाडे, नगराळे व गायकवाड यांनी वाहन चालकाकडुन तक्रारदार यांचा मोबाईल नंबर घेवुन तक्रारदार यांना फोन करुन धुळे शहराचे चाळीसगांव चौफुलीवर भेटण्यास बोलविले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी चाळीसगांव चौफुली येथे जावुन तलाठी दाभाडे व तलाठी गायकवाड यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना "तुला जर तुझ्या हायवाने वाहतुक करायची असेल तर तुला आता २०,०००/— रुपये द्यावे लागतील, नाही तर तुझ्या वाहनावर अवैध गौणवाहतुकीचा गुन्हा दाखल करु" असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी घाबरुन जावुन त्यांचेकडील ८,०००/— रुपये तलाठी दाभाडे यांचेकडे दिले. तेव्हा त्यांनी उर्वरीत १२,०००/— रुपये लागलीच आणुन देण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी दि.०७.०९.२०२६ रोजी ला.प्र.वि, धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती. |
| ५ | तक्रारीची पडताळणी | दि.०७.०९.२०२६ रोजी सदर तक्रारीची पडताळणी केली असता तलाठी दाभाडे यांनी तक्रारदार यांना फोनवरुन खाजगी इसम चौधरी यांना भेटुन घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी खाजगी इसम चौधरी यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे तलाठी दाभाडे यांचेकरीता १२,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तलाठी दाभाडे यांना फोन करुन तक्रारदार यांचे १२,०००/— रुपये लाचेची रक्कम मागणी केल्याबाबत खात्री करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. |
| ६ | सापळा कार्यवाही | दि.०८.०९.२०२६ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम चौधरी यांनी तक्रारदार यांचेकडुन १२,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या मोबाईलवरुन तक्रारदार यांचे तलाठी नगराळे यांचेशी लाच स्विकारले बाबत बोलणे करुन दिले. त्यानंतर खाजगी इसम चौधरी यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम तलाठी दाभाडे यांचेकडे दिली असता त्यांना लाच स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |
| ७ | गु.र.नं.,कलम/ पो.स्टे./ जिल्हा, दिनांक व वेळ | धुळे शहर पो.स्टे., जि. धुळे येथे भ्र.प्र.का. कलम ७ व ७—अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| ८ | आरोपी अटक दिनांक व वेळ | आरोपी क्र. ०१ व ०३ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |
| ९ | सापळा अधिकारी | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| १० | पर्यवेक्षक व तपास अधिकारी | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| ११ | सापळा पथक | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, स.फौ. राजन कदम, पोहेकॉ. मुकेश अहिरे, प्रविण मोरे, मकरंद पाटील, प्रविण पाटील, पोहेकॉ. सुधीर मोरे |
| १२ | मार्गदर्शन | श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, मो. नं.८८८८३२१४६<br>श्री. प्रदिप मैराळे, अपर पोलीस अधीक्षक मो.नं.९६७३९८८०००<br>श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस अधीक्षक, मो.नं.८१४९८३४४६५<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.**

| संपर्क पत्ता | घटक कार्यालय | परिक्षेत्रिय कार्यालय | ला.प्र.वि. मुख्यालय |
|---|---|---|---|
| पत्ता | ला.प्र.विभाग, धुळे संतोषी माता मंदिराजवळ, शिवतिर्थ, धुळे | ला.प्र.विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक, तिबेटियन मार्केट, मनपा, भाजीपाला मार्केटचे वर, शरणपुर रोड, नाशिक | ला.प्र.विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई |
| दुरध्वनी क्र., व्हॉटसअॅप क्र. | ०२५६२—२३४०२०<br>१०६४<br>७७९८१६१०६४ | ०२५३—२५७५६२८ | ०२२—२४९२१२१२ |
| इमेल आयडी | dyspacbdhule@gmail.com | spacbnasik@gmail.com | acbwebmail.mahapolice.gov.in |

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.